MHAU030149772025

**पी.डब्ल्यु. डी. व्ही. ए. क्र.३७६/२०२५**
**नि.क्र.०५ खाली अंतरिम पोटगीवरील आदेश**
**आसिफा बेगम वि. अझरोद्दीन कादीर**

अर्जदाराने कौटुंबिक हिसांचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा, २००५ चे कलम १२ अन्वये गैरअर्जदारांविरुध्द अर्ज दाखल केलेला आहे. त्यात सदर कायदयाचे कलम २३ अन्वये गैरअर्जदार यांचे कडुन "**अंतरिम पोटगी**" मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे.

०२. अर्जदार यांचे थोडक्यात कथन असे आहे की, अर्जदार हिचे लग्न गैरअर्जदार क्र.१ यांच्यासोबत मुस्लीम रितीरिवाजाप्रमाणे दिनांक ३१/०१/२०१८ रोजी कार्पोरेशन हॉल, सिल्क मिल कॉलनी, औरंगाबाद येथे झाले होते व त्यांचे लगन संबंध आजही कायम आहेत. अर्जदाराच्या लग्नाचा संपुर्ण खर्च त्यांच्या आई–वडीलांनी केला होता. लग्नात त्यांना सर्व संसार उपयोगी वस्तु देण्यात आल्या होत्या. त्यासोबतच सोन्या चांदीचे दागिने व इतर खर्च देखील तिच्या आई–वडीलांनी केला होता. एकुण अर्जदाराच्या आई–वडीलांनी अर्जदाराच्या लग्नासाठी जवळपास ६ लाख रुपये कर्ज करुन लग्न लावुन दिले होते. अर्जदाराचे सर्व दागिने हे गैरअर्जदारांच्या ताब्यात आहेत. लग्नानंतर अर्जदार हि गैरअर्जदारांच्या एकत्र कुटुंबात नांदायला गेली असता, तिला तिन महिने चांगले नांदविले. परंतु, त्यानंतर गैरअर्जदार क्र.१ ने तिच्यासोबत किरकोळ कारणांवरुन भांडण करण्यास सुरवात केली. सर्व गैरअर्जदार हे अर्जदारास म्हणत असत

की, प्लॉट घेण्याकरीता तुझ्या आई–वडीलांकडुन ५ लाख रुपये घेऊन ये. तिने गैरअर्जदारांना समजावुन सांगितले की, माझ्या आई–वडीलांची परिस्थिती हालाखीची आहे. ते पैसे देऊ शकत नाही. या कारणावरुन सर्व गैरअर्जदारांनी तिला घरात कोंडुन कुलुप लावुन निघुन गेले व तिला उपाशी ठेवले.

०३. अर्जदार हि काही कामधंदा करत नाही. तिला उत्पन्नाचे कुठलेही साधन नाही व ती तिच्या मुलांचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहे. याउलट, गैरअर्जदार यांचा बिल्डींग मटेरिअल पुरविण्याचा मोठा व्यवसाय असुन त्यापासुन गैरअर्जदार क्र.१ ला दरमहा एक लाख रुपये उत्पन्न मिळते. गैरअर्जदार क्र.२ यांचा देखील प्लॉटींगचा व्यवसाय आहे. गैरअर्जदारांकडे सहा चाकी लोडींग ट्रक असुन देखील त्यातुन देखील त्यांना उत्पन्न मिळते व त्यांच्या असलेल्या भाडयाने दिलेल्या दुकानामधुन देखील त्यांना उत्पन्न प्राप्त होते. त्यामुळे, अर्जदाराने दरमहा रुपये २०,०००/– अंतरिम पोटगी म्हणुन मिळावी अशी मागणी केली आहे.

०४. गैरअर्जदार यांनी त्यांचे लेखी म्हणणे दाखल केले व अर्जदारासोबत असलेले नातेसंबंध मान्य केले आहे. परंतु, मुळ अर्जातील मजकुर त्यांना खंडन केले असुन संपुर्ण मजकुरु खोटा, बनावट व न्यायालयाची दिशाभुल करणारा, वस्तुस्थितीच्या विरोधात मनघडन कथन केलेला असुन त्यांना मान्य नसल्याचे त्यांनी सांगितले आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, अर्जदारासोबत झालेला विवाह हा अतिशय साध्या पध्दतीने कोणतीही देवाण घेवाण न करता झाले होते. लग्नानंतर अर्जदार हि

सुरवातीला काही दिवस चांगले वागली. परंतु, त्यानंतर कुठलेही संयुक्तीक कारण नसतांना त्यांनी किरकोळ कारणावरुन गैरअर्जदारांसोबत भांडण करण्यास सुरवात केली. अर्जदार हि सतत गैरअर्जदार क्र.१ ला त्याच्या कमी उत्पन्नाबाबत हिनवत असे व तिचे भाऊ व वडीलांचे जास्त उत्पन्न आहे असे म्हणुन सतत टोमणे मारत असत. गैरअर्जदार क्र.१ चे तिच्यासोबत संसार करण्याची इच्छा असल्यामुळे ते तिला समजावुन सांगत असत. तरीही, त्याचा कुठलाही उपयोग झाला नाही.

०५. गैरअर्जदाराचे पुढे असे देखील म्हणणे आहे की, ती तिच्या मनाप्रमाणे माहेरी निघुन जात असे व जवळपास एक महिन्याकरीता परत येत नसे. तिने तिचे सर्व दागिने हे तिच्यासोबत नेले असुन ते तिच्या माहेरी आहेत. गैरअर्जदाराने नेहमी तिची काळजी घेतली आहे व तिच्यावर कुठल्याही प्रकारचा शारिरीक व मानसिक अत्याचार केला नाही. त्याचे पुढे असे देखील म्हणणे आहे की, तिच्या गरोदर पणाचा सर्व खर्च गैरअर्जदारांनी केला आहे. दिनांक ०८.१२.२०१८ रोजी तिची प्रसृती झाली त्यावेळी सर्व गैरअर्जदार हे हजर होते. त्यानंतर गैरअर्जदार क्र.१ ने तिला बरेच वेळा नांदायला नेण्याकरीता सांगितले. परंतु, तिने स्पष्ट नकार दिला. गैरअर्जदार क्र.१ ने तिला नांदण्याकरीता दावा देखील दाखल केला होता. परंतु, तरीही ती सासरी नांदण्यास आली नाही. ती सतत सर्व गैरअर्जदारांना खोटया पोलीस केसमध्ये अडकविण्याची धमकी देत असे. तिने गैरअर्जदारांच्या उत्पन्नाबाबत केलेले सर्व कथन देखील खोटे आहेत व ती कुठल्याही संयुक्ती कारणाशिवाय माहेरी राहत असल्यामुळे तिचा अंतरिम

पोटगीचा अर्ज नामंजुर करण्यात यावा असे गैरअर्जदारांचे म्हणणे आहे.

०६. अर्जदार व गैरअर्जदार यांच्या विद्ववान विधीज्ञांचे सविस्तर म्हणणे ऐकण्यात आले. सदर अर्जाचे निर्णयाकामी खालील मुद्दे उपस्थितीत झालेले आहेः-

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | सकृतदर्शनी अर्जदार ही कौंटुबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायद्याचे तरतुदी प्रमाणे पीडीत व्यक्ती आहे काय ? | होय. |
| २. | सकतदर्शनी गैरअर्जदारास पुरेसे उत्पन्नाचे साधन आहे काय ? | अंशतः होकारार्थी. |
| ३. | सकृतदर्शनी अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ कडुन अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय? असल्यास किती ? | अंशतः होकारार्थी. |
| ४. | आदेश काय ? | अंतिम आदेशप्रमाणे. |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दा क्र.१ ते ३ बाबतः-</u>**

०७. अर्जदाराच्या कथनाप्रमाणे अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांचे लग्न दिनांक ३१.०१.२०१८ रोजी कार्पोरेशन हॉल, सिल्क मिल कॉलनी, औरंगाबाद येथे झाले होते. गैरअर्जदार यांनी अर्जदारास तिन महिने चांगले नांदविले. गैरअर्जदार यांनी अर्जदार हिस शारिरीक, मानसिक, भावनिक व शाब्दीकस्वपात छळ करुन शिवीगाळ व मारहाण केली व प्लॉट घेण्यासाठी ५ लाख रुपयाची मागणी केली असल्याचे तिचे म्हणणे आहे. अर्जदार हिने तिच्यावर शारिरीक, मानसिक व कौटुंबिक अत्याचार झाल्याचे कथन केले

आहे. परंतु, त्याबाबत कुठेही लेखी तक्रार केली असल्याचे तिच्या अर्जात म्हणणे नाही.

०८. गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार हिचे आजतागायत उदरनिर्वाहाची सोय केल्याचे दिसत नाही. तसेच त्याने स्वतःहुन अर्जदारास पोटगी म्हणुन काही रक्कम दिल्याचे दिसुन येत नाही. अर्जदाराने केलेल्या मागणीच्या अनुषंगाने व कौटुंबिक हिसांचार हया संज्ञेची कायदेशीर व्यापकता लक्षात घेता अर्जदार ही सकृतदर्शनी कौटुंबिक हिसांचारापासुन महिलांचे संरक्षण कायद्याचे तरतुदीप्रमाणे पिडीत महिला असल्याचे दिसुन येते. सबब, मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे.

०९. अर्जदाराने कथन केले की, तिला स्वतःचे उत्पन्नाचे साधन नाही. तिचे असे म्हणणे आहे की, गैरअर्जदार क्र.१ हा बिल्डींग मटेरिअल पुरविण्याचा व्यवसाय करत असुन त्याला दरमहा रुपये १ लाख इतके उत्पन्न मिळते. तसेच, गैरअर्जदारांना उत्पन्नाचे इतर देखील पुरेसे साधन आहे. परंतु, अर्जदाराने गैरअर्जदाराच्या निश्चीत उत्पन्नाबाबत काही दाखल केले नाही. अर्जदार क्र.१ ने त्यांचा खर्च, उत्पन्न व दायित्व याबाबतचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. तसेच, गैरअर्जदार क्र.१ ने देखील त्या सारखेच प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

१०. आतापर्यंत अभिलेखावर आलेल्या बाबींवरुन प्रथमदर्शणी असे दिसुन येते की, गैरअर्जदारामुळे अर्जदार क्र.१ वर माहेरी राहण्याची वेळ तिच्यावर आली आहे. अर्जदार क्र.१ ही गैरअजदार क्र.१ यांची पत्नी व अर्जदार क्र.२ व ३ हे गैरअर्जदार क्र.१ चे मुलं असल्याने तिचा सांभाळ करण्याची कायदेशीर व नैतिक जबाबदारी ही

गैरअर्जदार क्र.१ वर असल्याचे दिसुन येते. गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदाराला पोटगी देण्याबाबत कोणताही आदेश आजतागायात झालेला नाही. अशा परिस्थितीत जीवनावश्यक वस्तुंचा किमंती, गैरअर्जदाराचे सकृतदर्शनी उत्पन्न, जबाबदाऱ्या व त्यांचे राहणीमानाचा दर्जा याबाबी विचारांत घेता अर्जदारांना मिळुन रुपये ८,०००/- इतकी रक्कम गैरअर्जदार क्र.१ कडून दरमहा अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे असे मत मी नोंदवित आहे. त्याप्रमाणे मुद्दा क्र.२ व ३ चा निष्कर्ष अंशतः होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.४ बाबतः-</u>**

११. मुद्दा क्र.१ ते ३ वरील विवेचनावरुन अर्जदारांना मिळुन रुपये ८,०००/- इतकी रक्कम गैरअर्जदार कडून दरमहा अंतरिम पोटगी म्हणुन मिळण्यास पात्र आहे. अर्जदाराने प्रस्तुत अर्ज दाखल केल्यापासुन दरमहा २०,०००/- रुपये इतकी अंतरिम पोटगी मिळावी अशी मागणी केलेली आहे. परंतु, अंतरिम पोटगी मंजुर करते वेळी ती अन्यायकारक ठरणार नाही या गोष्टीचा विचार देखील होणे गरजेचे आहे. त्यामुळे, तिने केलेली मागणी ही रास्त वाटत नाही.

१२. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज अंशतः मंजुर करणे न्यायोचीत ठरेल. गैरअर्जदार क्र.१ ने सदर अर्जाचे कामकाज चालु असतांना अर्जदारास उदरनिर्वाहकामी कोणतीही आर्थिक तरतूद केलेली नाही. ही बाब विचारात घेता सदर पोटगीची रक्कम अर्जदाखल तारखेपासून अर्जदारास देण्याचा आदेश करणे न्यायोचित ठरेल. तसेच सदर अर्जाचा

खर्च म्हणुन अर्जदारास रक्कम रुपये २,०००/- इतका खर्च देणे योग्य होईल. सबब, मुद्दा क्र.४ करिता मी खालील आदेश पारित करीत आहेः

**आ दे श**

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदारांना मिळुन रुपये ८,०००/- इतकी रक्कम दरमहा अंतरिम पोटगी म्हणुन अर्ज दाखल तारखेपासुन पुढील आदेश होईपर्यंत दयावेत.

३. अर्जदार हिस प्रस्तुत अर्जाचा खर्च रु.२,०००/- (रु. दोन हजार मात्र) गैरअर्जदार क्र.१ यांनी दयावा.

४. सदर आदेशाची एक प्रत अर्जदार हिस विनामूल्य दयावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by ANIKET MUSALE
Date: 2026.04.08 17:12:24 +0530

दिनांक :- ०८/०४/२०२६.

(अ. वि. मुसळे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.०६, औरंगाबाद.